# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

सहकार हाईट (पाच मजली इमारत), पहिला मजला, महानगरपालिका बिल्डींग, डिवाईन चर्च जवळ,
मिनाताई ठाकरे मंडईच्या बाजूला, रामदेव पार्क, मिरा रोड (पू.) ४०१ १०७ ईमेल : dtomhmbd@rntcp.org


जा.क्र.मनपाराक्षदुका/ 211 /2024-25 — दि. 11 /12/2024.

**<u>शासनाने दिलेले क्षयरुग्णांचे उदिदष्ट पुर्ण करण्यासाठी "सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम" अंतर्गत प्रशिक्षीत पथकातंर्गत घरोघरी जाऊन संशयीत क्षयरुग्ण शोधण्यास होणार सुरुवात.............</u>**

राज्यातील सर्व जिल्हे व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातंर्गत "सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम" दि. 23/12/2024 ते दि. 03/01/2025 रोजी राबविण्यात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सूचना निर्गमित करण्यात आल्या आहे. सदर मोहिमेचा उददेश हा मागील काही काळापासून कार्यक्रमातंर्गत क्षयरुग्णांची नोंदणी होण्याचे प्रमाण स्थिर किंवा कमी असल्यामुळे नवीन क्षयरुग्ण शोधणे हे आहे.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात जानेवारी 2024 ते डिसेंबर 2024 पर्यंत शासनाने दिलेल्या एकुण 2700 उदिदष्टांपैकी 2175 क्षयरुग्णांचे निदान केले आहेत. त्यामध्ये सरकारी क्षेत्रातून 626 रुग्ण नोंदणी झाले आहेत व खाजगी क्षेत्रातून 1549 रुग्ण नोंदणी झाले आहेत. तसेच मागील वर्षी नोंदणी झालेल्या 2680 पैंकी 2461 (92 टक्के) रुग्ण औषधोपचार देऊन बरे झाले आहेत.

"सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम" ही मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकुण लोकसंख्या 11,48,571 पैकी 10 टक्के (एकुण 1,14,857) लोकसंख्येमध्ये राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेमध्ये 57 पथकामार्फत 114 सदस्य काम करणार आहेत. सदर पथकातंर्गत सर्व्हेक्षण योग्यरित्या चालले आहे कि नाही याचे पर्यवेक्षण करण्यासाठी 11 पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर "सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम" अंतर्गत एकुण 22,971 घरोघरी सर्व्हेक्षण करुन अंदाजित 2,297 संशयीत रुग्ण शोधून त्यामधून 116 रुग्णांचे निदान करण्याचे उदिदष्ट प्राप्त केले जाणार आहे.

सदर मोहिम 10 दिवसाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे. मोहिमेत भाग घेणाऱ्या प्रत्येक सदस्याचे प्रशिक्षण वैदयकीय अधिकारी नागरी आरोग्य केंद्र यांच्याकडून घेतले जाणार आहे. सदर मोहिम यशस्वीरित्या राबविण्याकामी व अपेक्षित उदिदष्ट पुर्ण करण्याकरीता वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पडवळ व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बालनाथ चकोर यांनी मार्गदर्शन केले आहे.

सदर मोहिमेतंर्गत घरातील एकही सदस्य तपासणीपासून वंचित राहणार नाही व
कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष सर्व्हेक्षणासाठी जाणाऱ्या पथकास सहकार्य करण्याबाबत मा. उपायुक्त (सार्व.
आ) श्री. प्रसाद शिंगटे व मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर भा.प्र.से यांनी
मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जनतेस आवाहन केले आहे.

(डॉ. बालनाथ चकोर)
शहर क्षयरोग अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका